## मा.धर्मादाय उप आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर

बदल अर्ज क्र :- ७६५/२०२२.
(किरकोळ अर्ज क्र. ८८/२०२२)

न्यासाचे नाव :-दयानंद फौंडेशन, हडपसर, पुणे.
नोंदणी क्र :-एफ/५००७२/पुणे
(महा.१७५८/२०१७/पुणे)
कलम :- २२, व १२/१२(अ)

### नि.क्र.१ वरील आदेश
(दि.१७/०६/२०२२)

१. प्रस्तुतचा अर्ज महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२ नुसार न्यासाच्या ज्ञापन व नियम नियमावलीमध्ये झालेल्या बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता दाखल केलेला आहे. अर्ज वादरहित आहे.

२. अर्ज नि.क्र. १ चे अवलोकन केले असता, न्यासाची दिनांक २५.०६.२०२१ रोजी कार्यकारी मंडळाची सभा होऊन त्यातील ठरावानुसार न्यासाच्या ज्ञापन व नियम नियमावलीमध्ये बदल करण्यात आला तदनंतर न्यासाची दिनांक २८/०७/२०२१ रोजी पहिली विशेष सर्वसाधारण सभा होवून सदर सभेमध्ये सदरचा बदल मंजूर करणेत आला तसेच दिनांक ३०/०८/२०२१ रोजीच्या दुस-या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सदरचा बदल कायम करणेत आला. त्यानुसार झालेल्या बदलाची नोंद परीशिष्ट-१ वर घेणेकरीता प्रस्तुतचा बदल अर्ज दाखल केलेला आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

३. संस्था नोंदणी अधिनियम १८६० मधील कलम १२/१२ अ प्रमाणे किरकोळ अर्जाची पुर्तता केलेली आहे.

DAYANAND FOUNDATION

FOR DAYANAND FOUNDATION
AUTHORISED SIGNATORY

२

४. अर्जदाराने अर्जासोबत सर्व सभांच्या नोटीसा, नोटीस पोहोच, सभा उपस्थितीसह सभेच्या इतिवृत्तांच्या प्रती नि.०३ ते १५, न्यासाच्या प्रचलित ज्ञापन व नियम-नियमावलीची छायांकीत प्रत, सुधारित ज्ञापन व नियम नियमावलीची प्रत नि.१६ आणि अर्जदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र नि.१७ इ.कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

५. नि.क्र. १ नुसार कळविलेला बदल व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर बदल हा न्यासाच्या नियम-नियमावलीस अनुसरुन केला असल्यामुळे झालेला बदल वैध व कायदेशीर असल्याचे दिसुन येते. सबब खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे :-.

## आ दे श

१. बदल अर्ज व किरकोळ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. या आदेशाच्या दोन प्रती असून एक प्रत बदल अर्ज क्र. ७६५/२०२२ मध्ये लावली असून दुसरी प्रत किरकोळ अर्ज क्र. ८८/२०२२ मध्ये लावण्यात आलेली आहे.

३. परिशिष्ट १ वर नोंद घेण्यात यावी.

ठिकाण :- पुणे
दि :-१७/०६/२०२२.

(राहूल गों. मामु)
धर्मादाय उप आयुक्त,
पुणे विभाग पुणे

उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

सही शिक्क्याची खरी नक्कल
२२-६-२०२२
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
पुणे विभाग, पुणे.

मी नक्कल तयार केली
मी वाचली
मी रुजवात केली

DAYANAND FOUNDATION F-50072 PUNE

FOR DAYANAND FOUNDATION
AUTHORISED SIGNATORY